णी ॥ २ ॥ सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥ ३ ॥ आपुलें जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन आघवें आहे तैसें ॥ ४ ॥ तुका ह्मणे वीट नेघें आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ॥ ५ ॥

॥ ६४०८ ॥ वियोग न घडे सन्निध वसलें । अखंड राहिलें होय चित्तीं ॥ १ ॥ विसरु न घडे विकल्प न घडे । आलें तें आवडे तया पंथें ॥२॥ कामाचा विसर नाठवे शरीर । रसना मधुर नेणे फिकें ॥ ३ ॥ निरोपासी काज असो अनामिक । निवडितां एक नये मज ॥ ४ ॥ तुका ह्मणे हित चित्तें ओढियेलें । जेथें तें उगलें जावें येणें ॥ ५ ॥

॥ ६४०९ ॥ आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागलीसे ॥ १ ॥ सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ॥ २ ॥ काय लाभ झाला काय होतें केणें । काय काय कोणें सांटविलें ॥३॥ मागणें तें काय धाडिलें भातुकें । पुसेन तें सुखें आहेतसीं ॥४॥ तुका ह्मणे काय सांगती ते कानीं । ऐकोनियां मनीं धरुनी राहें ॥ ५ ॥

॥ ६४१० ॥ काय करावें म्यां केले ते विचार । घडेल साचार काय नाहीं ॥ १ ॥ काय मन नाहीं धरीत आवडी । प्रारब्धीं जोडी तेचि खरी ॥ २ ॥ काय म्यां तेथींचे रांधिलें चाखोनी । तें हें करी मनीं विवंचना ॥३॥ आणीकही त्यासी बहुत कारणें । बहु असे जिणें ओढीचेंही ॥ ४ ॥ तुका ह्मणे आह्मां बोळविल्यावरी । परती माघारी केली नाहीं ॥ ५ ॥

॥ ६४११ ॥ आम्हां आराणूक संवसारा हातीं । पडिली नव्हती आजीवरी ॥ १ ॥ पुत्रदाराधन होता मनीं धंदा । गोवियेलों सदा होतों कामें ॥ २ ॥ वोडवलें ऐसें दिसतें कपाळ । राहिलें सकळ आवरोनी ॥ ३ ॥ मागें पुढें कांहीं न दिसे पाहातां । तेथूनियां चिंता उपजली ॥ ४ ॥ तुका ह्मणे वाट पाह्याचें कारण । येथींचिया हीन झालें भाग्य ॥ ५ ॥

॥ ६४१२ ॥ बहु दिस नाहीं माहेरींची भेटी । झाली होती तुटी व्यवसायें ॥ १ ॥ आपुलाल्या होतों गुंतलों व्यासंगें । नाहीं सा प्रसंगे आठवलें ॥ २ ॥ तोडिलें तुटतें जडती जडलें । आहे तें आपुलें आपणापें ॥ ३ ॥ बहु निरोपाचें पावलें उत्तर । जवळीच पर एक तेंही ॥ ४ ॥ काय जाणों मोह होईल सांडिला । बहु दिस तुटला तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६४१३ ॥ होतीं नेणों झालीं कठिणें कठीण । जवळीच मन मनें ग्वाही ॥ १ ॥ आह्मी होतों सोई सांडिला मारग । घडलें तें मग तिकून

ही ॥ २ ॥ निश्चिंतीनें होतें पुढिलांचि सांडी । न चाली ते कोंडी मायबाप ॥ ३ ॥ आह्मां नाहीं त्यांचा घडला आठव । त्यांचा बहु जीव विखुरला ॥ ४ ॥ तुका ह्मणे झालें धर्माचें माहेर । पडिलें अंतर आह्मांकूनी ॥ ५ ॥

॥ ६४१४ ॥ आतां करावा कां सोस वांयांवीण । लटिकाचि सीण मनासी हा ॥ १ ॥ असेल तें कळों येईल लवकरी । आतां वारकरी आल्यापाठी ॥ २ ॥ बहु विलंबाचें सन्निध पातलें । धीराचें राहिलें फळ पोटीं ॥ ३ ॥ चालिलें तें ठाव पावेल सेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ॥ ४ ॥ तुका ह्मणे आसे लागलासे जीव । ह्मणऊनि कींव भाकीतसें ॥ ५ ॥

---

## वारकरी परत आल्यानंतरचे अभंग. ११.

---

॥ ६४१५ ॥ भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ॥ १ ॥ तुह्मी क्षेम कीं सकळ । बाळ अवघे गोपाळ ॥ २ ॥ मारगीं चालतां । श्रमलेती येतां जातां ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । कृपा आहे माझ्या ठायीं ॥ ४ ॥

॥ ६४१६ ॥ घालुनियां ज्योती । वाट पाहें दिवसराती ॥ १ ॥ बहु उतावेिळ मन । तुमचें व्हावें दरुषण ॥ २ ॥ आलों बोळवीत । तैसें याचि पंथें चित्त ॥ ३ ॥ तुका ह्मणे पेणी । येतां जातां दिवस गणीं ॥ ४ ॥

॥ ६४१७ ॥ आजि दिवस धन्य । तुमचें झालें दरुषण ॥ १ ॥ सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारीं वृत्तांत ॥ २ ॥ आइकतों मन । करुनी सादर श्रवण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम । माझा सकळ संभ्रम ॥ ४ ॥

॥ ६४१८ ॥ बोलिलीं तीं काय । माझा बाप आणि माय ॥ १ ॥ ऐसें सांगा जी झडकरी । तुह्मी सखे वारकरी ॥ २ ॥ पत्राचें वचन । काय दिलें फिरावून ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । मना आणिलें कीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ६४१९ ॥ काय पाठविलें । सांगा भातुकें विठ्ठलें ॥ १ ॥ आसे लागलासे जीव । काय केली माझी कींव ॥ २ ॥ फेडिलें मुडतर । किंवा कांहीं जरजर ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगा । कैसें आर्त पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ६४२० ॥ आजीचिया लाभें ब्रम्हांड ठेंगणें । सुखी झालें मन कल्पवेना ॥ १॥ आर्तभूत माझा जीव जयांसाठीं । त्यांच्या झाल्या भेटी पायांसवें ॥ २ ॥ वाढुली पाहातां सिणले नयन । बहु होतें मन आर्तभूत ॥३॥

माझ्या निरोपाचें आणिलें उत्तर । होईल समाचार सांगती तो ॥ ४ ॥ तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ॥ ५ ॥

॥ ६४२१ ॥ आजी बरवें झालें । माझें माहेर भेटलें ॥ १ ॥ डोळां देखिले सज्जन । निवारला भाग सीण ॥ २ ॥ धन्य झालों आतां । क्षेम देऊनियां संतां ॥ ३ ॥ इच्छेचें पावलों । तुका ह्मणे धन्य झालों ॥ ४ ॥

॥ ६४२२ ॥ वोरसोनी येती । वत्सें धेनुवेच्या चित्तीं ॥ १ ॥ माझा कराया सांभाळ । वोरसोनियां कृपाळ ॥ २ ॥ स्नेहें भूक तान । विसरती झाले सीण ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवतुकें । दिलें प्रेमाचें भातुकें ॥ ४ ॥

॥ ६४२३ ॥ आलें तें आधीं खाईन भातुकें । मग कवतुकें गाईन ओंव्या ॥ १ ॥ सांगितला आधीं आइकों निरोप । होइल माझा बाप पुसे तो तें ॥ २ ॥ तुका ह्मणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरींहून आजी ॥ ३ ॥

॥ ६४२४ ॥ आमूप जोडल्या सुखाचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं आतां ॥ १ ॥ काय सांगों सुख झालें आलिंगनें । निवाली दर्शनें कांति माझी ॥ २ ॥ तुका ह्मणे यांच्या उपकारासाटीं । नाहीं माझे गांठीं कांहीं एक ॥ ३ ॥

॥ ६४२५ ॥ पवित्र व्हावया घालीन लोळणीं । ठेवीन चरणीं मस्तक हें ॥ १ ॥ जोडोनी हस्तक करीन विनवणी । घेईन पायवणी धावोनियां ॥ २ ॥ तुका ह्मणे माझें भांडवल सुचें । संतां हें ठायींचें ठावें आहे ॥ ३ ॥

---

## नामदेवाची बाकी फेडली.

॥ ६४२६ ॥ कृतायुगीं नामा होउनी प्रल्हाद । होउनी अंगद त्रेतायुगीं ॥ १ ॥ द्वापारीं सेवेसी होऊनी, उद्धव । जगीं हा माधव तोषविला ॥ २ ॥ कलियुगीं रूपें घेतलींसी दोन । नामदेव होऊन जगीं ठेलों ॥ ३ ॥ तेथें भक्तिवाद केला होता पण । ग्रंथ हा करीन शतकोटी ॥ ४ ॥ करितां करितां तेथें उरली बाकी । तुका ह्मणे मुखीं आली माझ्या ॥ ५ ॥

॥ ६४२७ ॥ वेदाचे अभंग केले श्रुतिपर । द्वादशसहस्र संहितेचे ॥ १ ॥ निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र । अवतार सहस्र उपग्रंथ ॥ २ ॥ अभंग ते कोटी भक्तिपर केले । ज्ञानपर केले तितुके चि ॥ ३ ॥ पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें । नाम तें गाइलें तितुकें चि ॥ ४ ॥ साठीलक्ष केला बोधक ज-

नासी । वर्णिलें रूपासी तितुकें चि ॥ ५ ॥ द्वादशसहस्र आत्मबोध केला अनुभव घेतला एक सर्व ॥ ६ ॥ चौतीस सहस्र लक्ष कोटि पांच । सांगोनियां साच तुका गेला ॥ ७ ॥

---

## सखिभाव किंवा विरहिणीचे अभंग.

॥ ६४२८ ॥ बाळो जन मज ह्मणोत शिंदळी । परि हा वनमाळी न विसंबें ॥ १ ॥ सांडुनि लौकिक झालियें उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥ नाइकें वचन बोलतां या लोकां । म्हणे झालों तुका हरिरता ॥ ३ ॥

॥ ६४२९ ॥ आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥ १ ॥ रात्रंदिस मज पाहिजे जवळी । क्षण त्या निराळी न गमे घडी ॥ २ ॥ नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रातिलें अनंता तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ६४३० ॥ झालिया निःशंक फिटला कांसोटा । आतां मणगटा लावा चुना ॥ १ ॥ हाचि नेम आतां न फिरें माघारीं । बैसलें शेजारीं गोविंदाच्या ॥ २ ॥ घर रिघी झालें पट्टराणी बळें । वारलें सांवळें परब्रह्म ॥ ३ ॥ बळियाचा अंगसंग झाला आतां । रतलें अनंताचिये पायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे आम्हा नाहीं लाज आतां । भय धाक चिंता तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६४३१ ॥ नाहीं काम माझें काज तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां ॥ १ ॥ व्यभिचार माझा पडिला ठाउका । न सरती लोकांमाजी झालें ॥ २ ॥ न धरावा लोभ कांहीं मजविशीं । झालें देवपिशी तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ६४३२ ॥ विसरलें कुळ आपुला आचार । पती भावे दीर घर सोय ॥ १ ॥ सांडिला लौकिक लाज भय चिंता । रातलें अनंता चित्त माझें ॥२॥ मज आतां कोणी आळवाल ह्मणी । तुका म्हणे कानीं बहिरी झालें ॥ ३ ॥

॥ ६४३३ ॥ न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥ १॥ सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥ आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥३॥

॥ ६४३४ ॥ दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरि या अनंता पासूनियां ॥ १ ॥ बळियाच्या आह्मी झालों बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥ तुका ह्मणे आह्मी जिवाच्या उदारा । झालों प्रीतिकरा गोविंदासी ॥ ३ ॥

॥ ६४३५ ॥ क्षणभरी आह्मीं सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥ १ ॥ सांडी मांडी मार्गे केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥ तुका ह्मणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं॥३॥

॥ ६४३६ ॥ आह्मां आह्मी आतां वडिल धाकुटीं । नाहीं पाठी पोटीं कोणी दुजें ॥ १ ॥ फावला एकांत एकविध भाव । हरि आह्मांसवें सर्व भोगी॥२॥ तुका ह्मणे अंगसंग एके ठायीं । असो जेथें नाहीं दुजें कोणी॥३॥

॥ ६४३७ ॥ सर्व सुख आम्ही भोगूं सर्वकाळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥ १ ॥ याचसाठीं सांडियेले भरतार । रातलों या परपुरुषाशीं ॥ २ ॥ तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जें करूं फळ नव्हे ॥ ३ ॥

॥ ६४३८ ॥ एका जीवें आतां जिणें झालें दोहीं । वेगळिक कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥ नारायणा आम्हां नाहीं वेगळिक । पुरविली हे भाक सांभाळिली ॥ २ ॥ तुका म्हणे झालें सायासाचें फळ । सरली ते वेळ काळ दोन्ही ॥ ३ ॥

॥ ६४३९ ॥ हासों रुसों आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥ सेवा सुखें करूं विनोदवचन । आम्ही नारायण एकाएकीं ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही झालों उदासीन । आपुल्या आधीन केला पति ॥ ३ ॥

॥ ६४४० ॥ मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासिनी बाइयानों ॥ १ ॥ न साहवे तुम्हां या जनाची कूट । बोलती वाईट ओखटें तें ॥ २॥ तुका म्हणे झालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्यासवें आम्ही॥३॥

॥ ६४४१ ॥ शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग तों ॥ १ ॥ प्रसंगीं या नाहीं देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥ तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥३॥

॥६४४२ ॥ सांगतों तें तुम्हीं आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥ १ ॥ जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥ २ ॥ तुका म्हणे काय वांयांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥ ३ ॥

॥ ६४४३ आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण । कौतुकें खेळणें संग होता ॥ १ ॥ आतां अनावर झालें अगुणाची । करूं नये तें चि करीं सुखें ॥ २ ॥ तुका म्हणे आतां बुडविलीं दोन्ही । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥

॥ ६४४४ ॥ सासुरियां वीट आला भरतारा । इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥ सांडवर कोणी न धरिती हातीं । प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ २ ॥ न व्हावी ते झाली आमची भंडाई । तुका म्हणे कायी लाजों आतां ॥ ३ ॥

॥ ६४४५ ॥ मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥ आतां तुम्ही पाहा आमुचें नवल । नका वेचूं बोल वांयांविण ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी । कैसी संग सरी तुम्हां आम्हां ॥ ३ ॥

॥ ६४४६ ॥ परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें शीर ॥ १ ॥ संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ॥ २ ॥ तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपासोई ॥ ३ ॥

॥ ६४४७ ॥ आइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ॥ १ ॥ नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥ २ ॥ तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥३॥

॥ ६४४८ ॥ आहांच वाहांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैशा ॥ १ ॥ भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ॥ २ ॥ तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ॥३॥

॥ ६४४९ ॥ बहुतांच्या आम्ही न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१ ॥ विचार करितां वांयां जाय काळ । लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥ तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचिया ॥ ३ ॥

॥ ६४५० ॥ त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ॥ १ ॥ मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥ २ ॥ तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥ ३॥

॥ ६४५१ ॥ न राहे रसना बोलतां आवडी । पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥ १ ॥ मानेल त्या तुम्ही आइका स्वभावें । मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥२॥तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहुतीं । माझी तों हे गती झाली आतां॥३॥

॥ ६४५२ ॥ न बोलतां तुम्हां कळों न ये गुज । म्हणउनी लाज सांडियेली ॥ १ ॥ आतां तुम्हां पुढें जोडितसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥ २ ॥ तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ॥ ३ ॥

॥ ६४५३ ॥ एकली राणा गोविंदा सवें । गेलें ठावें तें झालें ॥ १ ॥ मज न ह्मणा न ह्मणा शिंदळी । नाहीं विषम जवळी आतळलें ॥ २ ॥ नव्हती देखिली म्यां वाट । ह्मणोनि हा धीट संग केला ॥ ३ ॥ भेणें मिठी दिधली गळां । सेजे जवळ दडालें ॥ ४ ॥ सलगी धरी पयोधर । साहाती करमुर सवें ॥ ५ ॥ आहेव मी गर्भीणपणें । हें सांगणें कां लागे ॥ ६ ॥ तुका ह्मणे सेवटा नेलें । संपादिलें उभयतां ॥ ७ ॥

॥ ६४५४ ॥ होतें बहुत हें दिवस मानसीं । आजि नवस हे फळले नवसीं ॥ व्हावी भेटी ते झाली गोविंदासीं । आतां सेवा करीन निश्चयेसी वो ॥ १ ॥ स्थिर स्थिर मज चि साहे करा । बहु कष्ट सोसिल्या येरझारा ॥ येथें आड मज न साहावे वारा । देऊनि कपाट आलें तें दुसरें वारा वो ॥ २ ॥ मूळ सत्ता हे सायासाची जोडी । नेदीं वेगळें होऊं एकी घडी ॥ नाहीं लौकिक स्मरला आवडीं । आतां येणें काळें या वो लोभें वेढी वो ॥ ३ ॥ उदयीं उदय साधिला आवकाश । निश्चितीनें निश्चिती सावकाश ॥ धरिये गोडी बहुत आला रस । तुका म्हणे हा मागुता नये दिवस वो ॥ ३ ॥

॥ ६४५५ ॥ स्वयें सुखाचे झाले अनुभव । एक एकीपाशीं सांगतील भाव ॥ अवघ्या अवघा हा कैसा नवलाव । सर्व साक्ष तेथें चि त्याचा जीव वो ॥ १ ॥ आपआपणाशीं करिती नवल । पारि वादावाद न सांडिती बोल ॥ एका मेघःशामें जलधर बोल । रसीं उतावेिळ हृदय सखोल वो ॥ २ ॥ एक विषय तो सकळांचा हरि । त्याच्या आवडीनें आवडी इतरी ॥ अंध बहिर हे प्रेत लोकाचारी । त्याची कीर्ती गाईली पुराणांतरीं वो ॥ ३ ॥ स्तुति पराविया मुखें रुचिकर । प्रीतिपात्राच्या गौरवीं आदर ॥ परस्परें हें सादरासादर । योग सज्जनाच्या सुखा नाहीं पार वो ॥ ४ ॥ भक्तिवल्लभ न तुटे चराचरीं । आप्त अनाप्त हे ऐशी ठेवी उरी ॥ दुरी जवळी संचिता ऐसें धरी । रंगा रंगा एसें होणें लागे हरी वो ॥ ५ ॥ तुका लाधला हें उच्छिष्ट भोजन । आला बाहेरी प्रेमें वोसंडून ॥ पडिलें कानीं सा जीवाचें जतन । धरियेले एकाभावें हृदयीं चरण वो ॥ ६ ॥

॥ ६३५६ ॥ याची सवें लागली जीवा । गोडी हेवा संगाचा ॥ १ ॥ परतें न सरवे दुरी । क्षण हरीपासुनि ॥ २ ॥ झालें तरों काय तंट । आतां चट न संडे ॥ ३ ॥ तुका म्हणे चक्र चाळे । वेड बळें लाविलें ॥ ४ ॥

॥ ६४५७ ॥ याचा तंव हा चि मोळा । देखिला डोळा उदंड ॥ १ ॥ नेदी मग फिरों मागें । अंगा अंगें संचरे ॥ २ ॥ कां गा याची नेणां खोडी जीभा जोडी कारितसां ॥ ३ ॥ पावरे तें बहु काळें । धोंगडे ही ठायींचें ॥ ३ ॥ अंगीं वसेचिना लाज । न ह्मणे भाज कोणाची ॥ ४ ॥ सर्वांसाक्षी अबोल्यानें । दुश्चित कोणें नसावें ॥ ५ ॥ तुका ह्मणे धरिला हातीं । मग निश्चिती हरीनें ॥ ६ ॥

॥ ६४५८ ॥ कोंडिलागे माज । निरोधुनि द्वार ॥ राखण तें बरें । येथें करा कारण ॥ १ ॥ हा गे हा गे हरि । करितां सांपडला चोरी ॥ घाला गांठीं धरी । जीवें माय त्रासाया ॥ २ ॥ तेंचि पुढें आड । तिचा लोभ तिला नाड ॥ लावुनी चरफड । हात गोउनी पळावें ॥ ३ ॥ संशयाचें बिरडें । याचे निरसले भेटी ॥ घेतली ते तुटी । आतां घेतां फावेल ॥ ४ ॥ तुका येतो काकुळती । वाउगिया सोड ॥ यासीच निवाड । आह्मी भार वाहिका ॥ ५ ॥

॥ ६४५९ ॥ तन मन माझें गोविंदाचे पायीं । वेधियलें बाई न सुटे चि ॥ १ ॥ गोत वित्त चित्त नाठवेसें झालें । मन विसरलें मनपणा ॥ २ ॥ लज्जा भय चिंता द्वेष मोह दुःख । तहान ही भूक विसरलें ॥ ३ ॥ विसरलें कूळ यातीचा स्वभाव । मिराशीचा गांव एक झाला ॥ ४ ॥ लागली समाधी नाठवे दुसरें । झालें एकसरें तद्रूपाचि ॥ ५ ॥ चिदानंदीं वृत्ती झालीसे निमग्न लावियलें लग्न स्वरूपेंसी ॥ ६ ॥ अखंड समाधी गोविंद नामाची । असे माझें मींचि तदाकार ॥ ७ ॥ तदाकार वृत्ती गोविंदाचे पायीं । तुका ह्मणे नाहीं दुजें आतां ॥ ८ ॥

॥ ६४६० ॥ वेधियेलें मन विसरलें देह । पती सुत गेह धन वित्त ॥ १ ॥ नाठवेचि भोग नाना उपचार । पडला विसर वासनेचा ॥ २ ॥ चिंता भय लज्जा निमालें हें दुःख । वोसंडलें सुख ब्रह्मानंद ॥ ३ ॥ विसरली मान पीडा करीजन । दिसे नारायण विश्वामाजी ॥ ४ ॥ तुका ह्मणे देह दिला पंढरीशा । तेव्हां ऐशी दशा आंगा आली ॥ ५ ॥

॥ ६४६१ ॥ हसूं रूसूं आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥ १ ॥ सेवा सुखें करूं आनंदवचन । आह्मी नारायण एका एकीं ॥ २ ॥ तुका ह्मणे आतां झालें उदासीन । आपुल्या आधीन केला पती ॥ ३ ॥

॥ ६४६२ ॥ आलियें धांवति धांवति भेट होइल म्हणून । तंव ते टळली वेळ वो माझा उरला सीण ॥ १ ॥ आतां काय करूं सांग वो मज भेटेल कैसा । हरिलागीं प्राण फुटे वो थोरी लागली आशा ॥ २ ॥ लाविला उशीर बहुतीं बहु ओढिती ओढा । सांभाळितां सांग असांग दुःख पावल्यें पीडा ॥ ३ ॥ जळो आतां संसारु वो कई शेवट पुरे । तुकयाच्या स्वामी गोपाळालागीं जीव झुरे ॥ ४ ॥

॥ ६४६३ ॥ हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ॥ १ ॥ आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ॥ २ ॥ पारखियांसी सांगतां गोष्टी । घरची कुटी खातील ॥ ३ ॥ तुका ह्मणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं धणीवरि ॥ ४ ॥

॥ ६४६४ ॥ धन्य बा ह्या ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥ १ ॥ चोरूनियां तुजपाशीं । येतां सांसी न कळतां ॥ २ ॥ दोन्हीं ठायीं समाधान । सम कठिण बहुतचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥ ४ ॥

॥ ६४६५ ॥ उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥ १ ॥ वेटाळिला भोंवता हरी । मयुर फेरी नाचती ॥ २ ॥ मना आलें करिती चार । त्या फार हा एकला ॥ ३ ॥ तुका ह्मणे नारायणीं । निरंजनीं मीनलिया ॥ ४ ॥

॥ ६४६६ ॥ आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥ १ ॥ न घडे मागें परतें मन । नारायण संभोगी ॥ २ ॥ वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥ ३ ॥ तुका ह्मणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या॥३॥

॥ ६४६७ ॥ कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सतंता ॥ १ ॥ अवघियांची जगनिंद । झाली धिंद सारखी ॥ २ ॥ अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ॥ ३॥ तुका ह्मणे करा सेवा । आलें जीवावर तरी ॥४॥

॥ ६४६८ ॥ येथील जे एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥ १ ॥ किती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥ २ ॥ अवघे दिवस गेले कामा । नाहीं जन्मा खंडण ॥ ३ ॥ तुका ह्मणे रतल्या जनीं । सोडा ह्मणी कान्होबा ॥ ४ ॥

॥ ६४६९ ॥ जैशा तुह्मी दुरी आहां । तैशा राहा अंतरें ॥ १ ॥ नका येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ जडलासे ॥ २ ॥ अवघा हाचि राखा काळ। त्रिकाळचि भोंवता ॥३ ॥ तुका ह्मणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ॥४॥

॥ ६४७० ॥ बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ॥ बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे ॥ २ ॥ नव्हतें आळवितें कोणी । इनें केला जगऋणी ॥ ३ ॥ ज्याचे सासी नेदी देऊं । तुका म्हणे धांवे खाऊं॥४॥

॥ ६४७१ ॥ काय करावें तें आतां । झालें नयेसें बोलतां ॥ १ ॥ नाहीं दोघांचियें हातीं । गांठी घालावी एकांतीं ॥ २ ॥ होय आपुलें काज। तों हे भीड सांडूं लाज ॥३॥ तुका ह्मणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ॥४॥

॥ ६४७२ ॥ हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ॥ १ ॥ केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ॥ २ ॥ घालोनियां भार माथां। अवघी चिंता वारली ॥३॥ तुका ह्मणे वचनासाठीं । नाम कंठीं धरोनि॥४॥

॥ ६४७३ ॥ अखंड मुडतर । सासुरवास करकर ॥ १ ॥ याची झाली बोळवण । आतां न देखों तो शीण ॥ २ ॥ बहुतांची दासी । तये घरीं सासुरवासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुळें । खंड झाला एका वेळे ॥ ४ ॥

॥ ६४७४ ॥ न गमे न गमे न गमे हरिविण । न गमे न गमे न गमे। मेळवा शाम कोणी गे ॥ १ ॥ तळमळ करी तैसा जीव जळाविण मासा। दिसती दिशा ओसा वो ॥ २ ॥ नाठवे भूक तान विकळ झालें मन। घडी जाय प्रमाण जुगा एकी वो ॥ ३ ॥ जरी तुह्मी नोळखा सांगतें ऐका। तुकयाबंधूचा सखा जगजीवन ॥ ४ ॥

॥ ६४७५ ॥ एक वेळे तरी जाईन माहेरा । बहूजन्म फेरा झाल्यावरी ॥ १ ॥ चित्ता हे बैसली अविट आवडी । पालट ती घडी नेघे एकी ॥ २ ॥ करावें तें करी कारण शरीर । अंतरीं सा धीर जीवनाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे तरी होईल विलंब । परी माझा लाभ खरा झाला ॥ ४ ॥

॥ ६४७६ ॥ उधानु काटीवारि चोपडुची आस । नवरा राजस मिरवतसे ॥ १ ॥ जिव्हाळ्याच्या काठी उबाळ्याच्या मोटा। नवरा चोहटा मिरवतसे ॥ २ ॥ तुळसीची माळ नवरीचे कंठीं । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ॥ ४ ॥

॥ ६४७७ ॥ एकली वना चालली राना । चोरूनि जना घराचारी ॥ १ ॥ कोणी नाहीं संगीसवें । देहभावें उदास ॥ २ ॥ जाऊनि पडे दुर्घ-

टवनीं । श्वापदानीं वेढिली ॥ ३ ॥ मार्ग न चले जातां पुढें । भय गाढें उदेलें ॥ ४ ॥ मागील मार्गें अंतरलीं । पुढील चाली खोळंबा ॥ ४ ॥ तुका ह्मणे चिंतीं यासि । हृदयस्थासी आपुल्या ॥ ५ ॥

॥ ६४७८ ॥ पडली घोर रजनी । संगीं कोणी नसे चि ॥ १ ॥ पहा हो कैसें चालविलें । पिसें गोवलें लावूनि ॥ २ ॥ कोठें लपविलें तें अंग । होता संग दिला तो ॥ ३ ॥ मज कधीं नव्हतें ठावें । दोहीं भावें वाटोळें ॥ ४ ॥ तुका ह्मणे कैंची उरी । दोहीपरि नाडिलें ॥ ४ ॥

# निर्वाण प्रकरण.

## आळंदीस एकादशीस किर्तनकाळीं काया ब्रह्म करण्याविषयीं संकल्प केला.

॥ ६४७९ ॥ भक्तितें नमन वैराग्यतो त्याग । ज्ञान ब्रह्मीं भोग ब्रह्मतनु ॥ १ ॥ देहाच्या निरसणें पाविजे या ठाया । माझी ऐसी काया जंव नव्हे ॥ २ ॥ उदक अग्नि धान्यें झाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥३॥ तुका ह्मणे मज कळते चांचणी । बडबडीची वाणी अथवा सत्य ॥ ४ ॥

## मग शंकाकारांस उत्तर दिलें.

॥ ६४८० ॥ वर्ण धर्म करिशी चोख । तरी तूं पावशी उत्तम लोक ॥ १ ॥ तुजला तें नाहीं ठावें । जेणें आंगें ब्रह्म व्हावें ॥ २ ॥ जरी तूं झालासी पंडित । करिसी शब्दांचें पांडित्य ॥ ३ ॥ गासी तान मान बंध । हाव भाव गीत छंद ॥ ४ ॥ जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पुजा यंत्र

॥ ५ ॥ करिसी साधनाच्या ओढी । जळो याच्या मोडामोडी ॥ ६ ॥ तुका ह्मणे देही । संत झाले ते विदेही ॥ ७ ॥

## पुनः शंकाकारास प्रत्युत्तर दिल्हें.

॥ ६४८१ ॥ घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिति सांडविन ॥ १ ॥ ब्रह्मभूत होते कायाच किर्तनीं । भाग्यतरीं ऋणी देव ऐसा ॥ २ ॥ सांडविन तपोनिधां अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ३ ॥ तिर्थभ्रमकांसीं आणिन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ॥ ४ ॥ भक्ति भाग्य प्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निज ठेवा ॥ ५ ॥ धन्य म्हणविन इहलोकीं लोकां । भाग्यें आम्ही तुका देखियेला ॥ ६ ॥

## लोहगांवच्या लोकांच्या प्रेमावरून तुकोबांचा त्यांच्याकडे ओढा.

॥ ६४८२ ॥ तृषाकाळें उदकभेटी । पडे मिठी आवडिची ॥ १ ॥ ऐसियांचा होकां संग । जिवलग संताचे ॥ २ ॥ मिष्टान्नाचा येग भुके । ह्मणतां चुके पुरे ऐसें ॥३॥ ॥ तुका म्हणे कळवळा । माय बाळा मध्यें तो॥४॥

## लोहगांवीं किर्तन करीत असतां परचक्रानें गांव लुटून लोकांस त्रास दिला तो सहन झाला नाहीं ह्मणून आपणांस वैकुंठीं नेण्यास देवाचा धांवा केला ते अभंग

॥ ६४८३ ॥ न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥ १ ॥ काय तुझी येथें नसालसें झालें । आह्मीं न देखिलें पाहिजे हें ॥ २ ॥ परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें झालें॥४॥

॥ ६४८४ ॥ काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जनीं ऐसें ॥ १ ॥ उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥२॥ पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥ ४ ॥

॥ ६४८५ ॥ भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ॥ १ ॥ आमची तो जाती ऐसी परंपरा । कां तुह्मी दातारा नेणां ऐसें ॥ २ ॥ भजनीं विक्षेप तेंची पैं मरण । न वजावा क्षण एक वांयां ॥३॥ तुका ह्मणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥ ४ ॥

॥ ६४८६ ॥ बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें पुण्य कोण मा-झ्यागांठीं ॥ १ ॥ जाता आतां आज्ञा घेऊनिया स्वामी । काळक्षेप आम्ही करूं कोठें ॥ २ ॥ न घडे यावरी न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ॥ ३ ॥ तुका म्हणे तुह्मी दिसे मोकालिलें । काय आतां आलें जीवि-त्वाचें ॥ ४ ॥

॥ ६४८७ ॥ शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणो पोटीं आहे ॥ १ ॥ त-रिच नेघाजी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ॥ २ ॥ जावें वनांतरा । येणें उद्देशें दातारा ॥ ३ ॥ तुका म्हणे गिरी । मज सेववावी दरी ॥ ४ ॥

॥ ६४८८ ॥ येईल तुझ्या नामा । लाज म्हणून पुरुषोत्तमा ॥ १ ॥ धीर राहिलों धरुनी । त्रास उपजला मनीं ॥ २ ॥ जगा कथा नाव । नि-राशेनें नुपजे भाव ॥ ३ ॥ तुम्हीं साक्षी कीं मा । तुका म्हणे पांडुरंगा ॥४॥

॥ ६४८९ ॥ नेणें जपतप अनुष्ठान याग । काळें जव लाग घेतलासे ॥ १ ॥ रिघालों या भेणें देवाचे पाठिसीं । लागे त्याचे त्यासी सांभाळावें ॥२॥ मापे माप सळे चालिली चढती । झाली मग राती काय चाले ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरां हातीं जे वांचले । लाभावारीं आलें वरी लेखूं ॥ ४ ॥

॥ ६४९० ॥ कळों आलें ऐसें आतां । नाहीं तुम्हां संतांसीं ॥ १ ॥ तरी विर्ये नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ॥ २ ॥ आड ऐसें येतें पाप । वाढे ताप आगळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला । हा विठ्ठल हिणशक्ति ॥४॥

॥ ६४९१ ॥ लागों दिल्हें आंग । ऐसें कां गा सन्निध ॥ १ ॥ कोण्या पापें उदो केला । तों देखिला प्रळय ॥ २ ॥ न देखवे पीडिला सर्प । जया दर्प विषाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भलें । मज तों नवजे साहीलें ॥ ४ ॥

॥ ६४९२ ॥ धांवा शिघ्रवत । किंवा घ्यावे दंडवत ॥ १ ॥ तुमचा जातो बडिवार । आह्मी तों हीणवर ॥ २ ॥ न धरवे धिर । धांवा नका चालों स्थिर ॥ ३ ॥ तुका म्हणे वाणी । माझी लाजिली जी गुणी ॥ ४ ॥

॥ ६४९३ ॥ सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामि जाणे ॥ १ ॥ मनाचिये मुळीं सहावें बैसोन । अकशावे गुण पायांपासीं ॥२॥ भेटीचे तातडी कारितसे लाहो । ओंवाळावा देहो ऐसें वाटे ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें करावें कारण । आपुलें जतन ब्रिद साचें ॥ ४ ॥

॥ ६४९४ ॥ उद्वेगासी बहू फांकती मारग । नव्हे ऐसें अंग माझें होतें ॥ १ ॥ आतां कोण यासि करणें विचार । तो देखा साचार पांडुरंगा ॥२॥ मज तो असंत दरुषणाचि आस । झाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥ ३॥ तुका म्हणे आहे वचनाचि उरी । कारितों तोंवरी विज्ञापना ॥ ४ ॥

॥ ६४९५ ॥ नये नेत्रीं जळ । नाहीं अंतरीं कळवळ ॥१ ॥ तों हे चावटीचे बोल । जन रंजवणें फोल ॥ २ ॥ न फळे उत्तर । नाहीं स्वामि जों सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटी । जवें नाहीं दृष्ट दृष्टीं ॥ ४ ॥

---

आपणां स्वतःस दुःख झालें म्हणून धांवा केला नाहीं. लोकांचें दुःख पहावत नाहीं ह्मणून धावां केला.

---

॥ ६४९६ ॥ नाहीं मागितला । तुम्हा मान म्यां विठ्ठला ॥ १ ॥ जे हे करविली फजिती । माझी येवढी जनां हातीं ॥ २॥ नाहीं केलें पोंट । पुढें घालूनी बोभाट ॥ ३ ॥ तुका ह्मणे धरुनी हात । नाहीं नेलें दिवाणांत ॥ ३ ॥

॥ ६४९७ ॥ बोलतों निकुरें । नव्हत सलगीचीं उत्तरें ॥ १ ॥ माझें संतापलें मन । परपिडा ते पाहोन ॥ २ ॥ आंगांवरी आलें । तोंवरी जाईल सोसीलें ॥ ३ ॥ तरी तुज भक्तांची आण देवा । जरी तुका येथें ठेवा ॥ ४ ॥

॥ ६४९८ ॥ आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपासीं । जरी तूं भितोसी पांडुरंगा ॥ १ ॥ पाहे विचारून तुज आहे ठावें । आह्मी धालों नांवें तुझ्या एका ॥ १ ॥ रिद्धि सिद्धि तुझें मोक्ष भांडवल । हे तों आह्मां फोल भक्ति पुढें ॥३॥ तुका ह्मणे जावें वैकुंठा चालत । बैसोनी निवांत सुख भोगूं ॥४॥

ऐसी देवास आण घालून देहुग्रामास येऊन सभोंवते संत समुदाय असून मध्यें आपण बसले तों अकस्मात जरा प्रत्यक्ष वृद्ध स्त्रीच्या रूपें येऊन कानीं सांगितलें कीं काळ सन्निध आला.

॥ ६४९९ ॥ जरा कर्णमुळीं सांगों आली गोष्टी । मृत्युचीये भेटी जवळी आली ॥ १ ॥ आतां माझ्या मना होईं सावधान । हे पुण्याची जाण कार्य सिद्धि ॥ २ ॥ सेवटील घडी बुडतां नलगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥ ३ ॥ तुका ह्मणे चिंति कुळीची देवता । वाराबा भोंवता मिथ्या शब्द ॥ ३ ॥

तेव्हां तुकारामबावा परम सावध होऊन पत्र लिहून मनोदुतां हातीं शेषशयनीं श्रीनारायणास धाडिलें.

॥ ६५०० ॥ काळावरी घालूं तरी तो सरिसा । न पुरवितां ईच्छा दास कैंचे ॥ १ ॥ आतां नाहीं कांहीं उशिराचें काम । न खंडावें प्रेम नारायणें ॥ २ ॥ देणें झालें मग विलंब कां आड । गोड तरी गोड आदि अंतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे होईल दर्शनें निश्चिती । गाईन तें गीतीं ध्यान मग ॥ ४ ॥

॥ ६५०१ ॥ आतां कशासाठीं दुरी । अंतर उरी राखिली ॥ १ ॥ करी लवकरी मुळ । लाहाणे तीळ मुळींचिया ॥ २ ॥ दाही ठायीं उद्योग वाणे । दरुषणें निश्चिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठता ॥ ३ ॥

॥ ६५०२ ॥ उसंतीलया कर्मवाटा । बहुमोठा आघात ॥ १ ॥ शिघ्र यावें शिघ्र यावें । हातीं न्यावें धरोनी ॥ २ ॥ भागलों ये खटपटे । घटपटें करितां ॥ ३ ॥ तुका म्हणे कृपावंता । माझी चिंता खंडावी ॥ ४ ॥

॥ ६५०३ ॥ संतांचे उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृत्युलोकीं राहा-
णेंसा ॥ १ ॥ म्हणऊनि बहु तळमळी चित्त । येईं वो धांवत पांडुरंगा ॥२॥
उपजली चिंता लागला उसीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ॥ ३ ॥ तुका
म्हणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसें झालें ॥ ४ ॥

॥ ६५०४ ॥ धर्माचि तूं मूर्ती । पाप पुण्य तुझे हातीं ॥ १ ॥ मज सोडवीं
दातारा । कर्मापासूनि दुस्तरा ॥ २ ॥ करिसी अंगीकार । तरी काय माझा
भार ॥ ३ ॥ जिवींच्या जीवना । तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥

॥ ६५०५ ॥ धरुनियां चाली हांवा । येईन गांवा धांवत ॥ १ ॥ पा-
ठविसी मूळ तरि । लवकरि विठ्ठले ॥ २ ॥ नाचेन सा प्रेमसुखें । कीर्ती
मुखें गाईन ॥ ३ ॥ तुका म्हणे संतमेळीं । पायधुळी वंदीन ॥ ४ ॥

॥ ६५०६ ॥ आपुले गांवींचें न देखेसें झालें । परदेसी एकलें किती
कंठुं ॥१॥ ह्मणऊनि पाहें मुळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥ २ ॥
पाहतां अवघ्या दिसतील दिशा । सकळ ही वोसा दृष्टीपुढें ॥ ३ ॥ तुका
ह्मणे कोणी न संगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ६५०७ ॥ आतां बरें झालें । सकाळींच कळों आलें ॥ १ ॥ मज न
ठेवीं इहलोकीं । आलों तेव्हां झाली चुकी ॥ २ ॥ युगमहिमा ठावा ।
नव्हता ऐसा पुढें देवा ॥३॥ तुका म्हणे ठेवीं । भोगासाठीं निरयगांवीं ॥४॥

॥ ६५०८ ॥ तुह्मासी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ॥ १ ॥ कां
बा तुह्मी ऐसें नेणां । निष्ठुरपणें ढाळीतसां ॥ २ ॥ आळवितां मायबापा ।
नये कृपा अझुनि ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगदिशा । काय असां निजेले ॥ ४ ॥

---

## पत्र पाठविल्यानंतर गरुडानी लक्ष्मीची व शेषाची प्रार्थना केली.

---

॥ ६५०९ ॥ गरुडाचे पायीं । ठेवीं वेळो वेळां डोई ॥ १ ॥ वेगें आ-
णावा तो हरी । मज दिनातें उद्धरी ॥ २ ॥ पाय लक्ष्मीचे हातीं । ह्मणुनी
येतों काकुळती ॥ ३ ॥ तुका म्हणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ ४ ॥

हें पत्र नारायणानें पाहून विष्णुस आज्ञा केली कीं तुकारामास देहासहित वैकुंठास आणून तेथील सुख दाखवून येथें आणून घालावा तेव्हां विष्णुनें सनकादिकांस समाचारास पाठविलें.

॥ ६५१० ॥ तुम्ही सनकादिक संत । म्हणवितां कृपावंत ॥ १ ॥ एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ॥ २ ॥ माझी भाकुनी करुणा विनवा वैकुंठींचा राणा ॥ ३ ॥ तुका म्हणे मज आठवा । मुळ लवकरी पाठवा ॥ ४ ॥

तेव्हां सनकादिकांनीं तुकोबास वृत्तांत सांगितला कीं श्री नारायणाचे आज्ञेवरून विष्णु तुह्मास वैकुंठास देहासहित न्यावयास सत्वरच येतील असें सांगून सनकादिक वैकुंठास गेले तेव्हां तुकोबा परम समाधान पावून अभंग बोलले.

॥ ६५११ ॥ आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ॥ १ ॥ सुख दुःख माझें ऐकियलें कानीं । कवळला मनीं करुणेचा ॥ २ ॥ करूनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिवसें एकें न्यावयासी ॥ ३ ॥ त्याची पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया माय बाप ॥ ५ ॥

वैकुंठास जाण्यापूर्वी पंढरीनाथास भेटावें ह्मणून त्यास पत्र पाठविलें.

॥ ६५१२ ॥ संतांचे उपदेश आमचे मस्तकीं । नाहीं ईह लोकीं रहाणें आतां ॥ १ ॥ ह्मणुनी बहु तळमळे चित्त । येई हो धांवत पांडुरंगे ॥ २ ॥

उपजलि चिंता लागला उशिर । होत नाहीं धीर निढळ वाढें ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसें झालें ॥ ४ ॥

पत्र वाचतांच पंढरीनाथ रुक्मिणी वगैरे स्त्रिया व पुंडलिकादि भक्तांसह भेटीस निघाले असतां तुकारामबावांस सुचिन्हें होऊं लागलीं.

॥ ६५१३ ॥ चिन्हें उमटताती अंगीं । शकुनाजोगीं उत्तम ॥ १ ॥ आठवले बाप माय । येईल काय मुळ नेणों ॥२॥ उत्कंठित झालें मन । तेची खूण तेथींची ॥ ३ ॥ तुका ह्मणे काम वारी । आळस घरीं करमेना ॥ ३ ॥

॥ ६५१४ ॥ आरोनियां पाहें वाट । कटकट सोसेना ॥ १ ॥ आलियासी पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥ २ ॥ दळीं कांडीं लोकां ऐसें । परी मी नसें ते ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पिसें । तेथें तैसें असेल ॥ ४ ॥

॥ ६५१५ ॥ येथिलिया अनुभवें । कळों जीवें येतसे ॥ १ ॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव सा अंगीं ॥ २ ॥ भुकें भूक खाउन धाय । नुरे हाय अन्नाची ॥ ३ ॥ तुका म्हणे सुख झालें । अंतर घालें सा गुणें ॥ ४ ॥

॥ ६५१६ ॥ सांगतां गोष्टी लागती गोडा । हा रोकडा अनुभव ॥ १ ॥ सुख झालें सुख झालें । नये बोलें बोलतां ॥ २ ॥ अंतर तें नये दिसों । आतां सोस कासया ॥ ३ ॥ तुका म्हणे जतन करूं । हेंची जीवेंसीं ॥ ४ ॥

सत्वरच अपणास श्रीहरीचें दर्शन होईल ह्मणून तुकारामबावा परम संतोष पावले इतक्यांत यमधर्मानें काळ यमदुतांस अज्ञापिलें कीं सत्वर जाऊन तुह्मी तुकारामबावांस नमन करून सांगणें कीं आपण कृपा करून यावें ऐसें ऐकून काळ यमदुतांनीं येऊन तुकारामबावांस नमून सांगितलें तेंव्हां स्वामी अभंग बोलले.

॥ ६५१७ ॥ आतां चक्रधरा । झणी आह्मासी अव्हेरा ॥ १ ॥ तुमचें म्हणविल्यावरी । जैसीं तैसीं तरी हरी ॥ २ ॥ काळ आम्हा खाय । तरी तुझें नाम जाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । आतां पण सिद्धी न्यावा ॥ ४ ॥

ऐसें बोलून तुकारामबावानीं वैकुंठवासी देवानें सत्वर यावें ह्मणून त्यांचा धांवा केला तो अभंग.

॥ ६५१८ ॥ धांवे धांवे गरुडध्वजा । आह्मा अनाथांच्या काजा ॥१॥ बहु जाहलों कासाविस । ह्मणूनी पाहें तुझी वास ॥ २ ॥ पाहें पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥ ३ ॥ असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥ ४ ॥ न लावावा उशीर । नेणों कांहो केला धीर ॥ ५ ॥ तुका ह्मणे चालीं । नको चालूं धांव घालीं ॥ ६ ॥

असा धांवा केल्यावर देव येत आहेत असें पाहिलें.

॥ ६५१९ ॥ पैल आले हरी । शंख चक्र शोभे करीं ॥ १ ॥ गरुडाच्या फडत्कारें । नाभी नाभी ह्मणे त्वरें ॥ २ ॥ मुगुट कुंडलांची दिप्ति । तेजें लोपला गभस्ती ॥ ३ ॥ पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥४॥ मेघःश्याम वर्ण हरी । मूर्ती डोळस साजिरी ॥ ५ ॥ चतुर्भुज वैजयंती । कंठीं माळ हे रुळती ॥ ६ ॥ तुका झाला संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥ ७ ॥

॥ ६५२० ॥ शंखचक्र गदा पद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥ १ ॥ नाभी नाभी भक्तराया । वेगें पातलों सखया ॥ २ ॥ दुरोनि येतां दिसे दृष्टी । धाकें दोष पळती सृष्टी ॥ ३ ॥ तुका देखोनि एकला । वैकुंठींहूनि हरि आला ॥ ४ ॥

॥ ६५२१ ॥ पुष्टकांती निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगें ॥ १ ॥ अंतर्बाह्य विलेपन । हें भूषण मिरवूं ॥ २ ॥ ईच्छे ऐसी आवडी पुरे । विश्वंभरे जवळी ॥ ३ ॥ तुका करी नारायण । दया सेवन नामांचें ॥ ४ ॥

हें यमाच्या किंकरांनीं पाहून ते तुकाराम बावांस सोडून पळाले.

॥ ६५२२ ॥ भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥१॥ आले वैष्णव वीर । काळ कांपती असुर ॥ २ ॥ गरुड टाकियाच्या भारें । भुमि गर्जे जयजयकारें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळ । पळे देखोनियां बळ ॥ ४ ॥

याचवेळेस पंढरीनाथ आपल्या परिवारासहित आले.

॥ ६५२३ ॥ पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥ १ ॥ आला पंढरीचा राणा । दिसती त्या याच्या खुणा ॥२॥ सुख वाटे मनां । डोळे वाह्या स्फुरती ॥ ३ ॥ उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवाचे ॥ ४ ॥ तुका करी रिता ठाव । सांसी बैसावया वाव ॥ ५ ॥

ऐसें बोलून आपले समागमीं संत महंत होते त्यांसहित पंढरीनाथास सामोरे परम सद्भावें लोटांगणीं चालले तेव्हां बोललेला अभंग.

॥ ६५२४ ॥ चला जाऊंरे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥ १ ॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ॥ २ ॥ फेडावया धणी । प्रेमसुखाची आटणी ॥ ३ ॥ पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥ ४ ॥ तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठ्ठलाच्या पायीं ॥ ५ ॥

नंतर नारायणाचें स्तवन केलें.

॥ ६५२५ ॥ नमो विष्णु विश्वरूपा मायबापा । अपार अमुपा पांडुरंगा ॥ १ ॥ विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आयकावें ॥२॥ तुझी स्तुती वेद करितां भागला । निवांतचि ठेला नेती नेती ॥ २ ॥ ऋषी मुनी बहु सिद्ध कवीजन । वर्णितां गुण न सरती ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेथें काय माझी वाणी । जी कीर्ति वाणी तुझी देवा ॥ ४ ॥

मग तुकाराम बावांनीं देवांस घरीं येण्यास अमंत्रण केलें.

॥ ६५२६ ॥ चाल घरा उभा राहे नारायणा । ठेऊंदे चरणांवरी डोई ॥ १ ॥ प्रक्षाळुं दे पाय बैस माज घरीं । चित्त स्थिर करी नाराय-

णा ॥ २ ॥ आहे त्या संचितें करावीन भोजन। काय न जेऊन करशी आतां ॥ ३ ॥ करुणाकरें कांहीं कळों दिलें वर्म । दुरी होतों भ्रमें कोण वरीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां आवडीच्या संता । बोलिलों अनंता करविनतें ॥ ५ ॥

## देव घरीं आल्यावर त्यांस आपल्या स्थितीचें वर्णन केलें.

॥ ६५२७ ॥ इह लोकीं आम्हां भुषण अवकळा । भोपळा वाकळा आणि भिक्षा ॥ १ ॥ निमाली संपदा भया विरहीत । सर्वकाळ चित्त समाधान ॥२॥ छिद्रांचा अश्रम उंदिर कुळवाडी । धाम नामा जोडी देवाचें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे एकें सेवटीं रहाणें । वर्तोया जन अवघे या ॥ ४ ॥

## देवास व संतांस पावण्हेर केला.

॥ ६५२८ ॥ पाहुणे घरासी । आजी आले ऋषीकेशी ॥ १ ॥ काय करूं उपचार । कोप मोडकी झांजर ॥ २ ॥ दरदुरीत कण्या । माजि रांधिपेल्या पाण्यां ॥ ३ ॥ घरीं मोडाकिया बाजा । वरीं वाकळांच्या शेजा ॥ ४ ॥ मुख शुद्धी तुळसी दळ । तुका ह्मणे मी दुर्बळ ॥ ५ ॥

॥ ६५२९ ॥ संतीं केला अंगीकार । त्यासी अभिमान थोर ॥ १ ॥ कांहीं ठेविलें चरणीं । घेती तेची पुरवणी ॥ २ ॥ तुका पायवणी । घेउनी निराळा ॥ ३ ॥ नसतां कांहीं संचित । भेटी झाली अवचित ॥ ४ ॥ देव मिळोनीयां भक्त । तुका म्हणे केला सनाथ ॥ ५ ॥

## देवानें आवडीनें कण्याची पेज सेवन केली.

॥ ६५३० ॥ ऐका महिमा आवडीची । बोरें खाय भिल्लटिचीं ॥ १ ॥ थोर प्रेमाचा भुकेला । हाची दुष्काळ तयाला ॥ २ ॥ पोहे सुदाम देवाचे । फके मारी कोरडेच ॥ ३ ॥ न ह्मणे उचिष्ट अथवा थोडें । तुका ह्मणे भक्ति पुढें ॥ ३ ॥

## देवभक्त जेवल्यानंतर लक्ष्मी, सत्यभामा, रुक्मिणी वगैरे तुकारामबावांच्या गृहीं प्रवेशून जिजाबाईच्या संसारास हंसल्यावरून ती तुकारामबावांस कठोरोत्तरें बोलली ते अभंग.

॥ ६५३१ ॥ मज चि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥ १ ॥ चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुके चि ना ॥ २ ॥ कोणाची बाईल होऊनियां बोदूं । संवसारीं काढूं अपदा किती ॥ ३ ॥ काय तरी देऊं तोंडतील पोरें । मरतीं तरी बरें होतें आतां ॥ ४ ॥ कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया ढोर शेण नाहीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे रांड न करितां विचार । वाहुनियां भार कुंथे माथा ॥ ६ ॥

॥ ६५३२ ॥ काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ॥ १ ॥ किती सर्वकाळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरी ॥ २ ॥ झवे आपुली आई काय माझें केलें । घड या विठ्ठलें संसाराचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे येती बाइले असडे । फुंदोनियां रडे हांसे काहीं ॥ ४ ॥

॥ ६५३३ ॥ गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरा ॥ १ ॥ भरी लोकांचीं पाठोरी । मेला चोरटा खाणोरी ॥ २ ॥ खवळली पिसी । हातां झोंबे जैसी लासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ॥ ४ ॥

॥ ६५३४ ॥ आतां पोरा काय खासी । गोहो झाला देवळसी ॥ १ ॥ डोचकें तिंबी घातल्या माळा । उद्‌माचा सांडी चाळा ॥ २ ॥ आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ॥ ३ ॥ हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापासीं ॥ ४ ॥ आतां आह्मी करूं काय । न बसे घरीं राना जाय ॥ ५ ॥ तुका ह्मणे आतां धीरी । आझुनि नाहीं झालें तरी ॥ ६ ॥

॥ ६५३५ ॥ बरें झालें गेलें । आजी अवघें मिळालें ॥ १ ॥ आतां खाइन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी ॥ २ ॥ किती तरी तोंड । यासीं वाजवूं मी रांड ॥ ३ ॥ तुका बाइले मानवला । छिःथू करूनियां बोला ॥ ४ ॥

॥ ६५३६ ॥ न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥ १ ॥ उठिलें तें कुटिलें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥ २ ॥ जीवंत चि मेले । लाजा वाटुनियां प्याले ॥ ३ ॥ संवसाराकडे । न पाहाती ओस पडे ॥४ ॥ तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ॥ ५ ॥ तुका ह्मणे बरें झालें । घे गे बाइले लीहिलें ॥ ६ ॥

॥ ६५३७ ॥ कोण घरा येतें आतुच्या काशाला । काय ज्याचा साला नाहीं धंदा ॥ १ ॥ देवासाठीं झालें ब्रह्मांड सोइरें । कोमळ्या उत्तरें काय वेचे ॥ २ ॥ मानें पाचारितां नव्हे आराणुक । ऐसे येती लोक प्रीतीसाठीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे रांडे नावडे भूषण । कांतेलेंसे श्वान लागे पाठीं ॥ ४ ॥

॥ ६५३८ ॥ निजों नेदी सकाळवेळीं । रातींकाळीं चिनचिनी ॥ १ ॥ वोंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासी ॥ २ ॥ मेळवूनि सर्व जन । चिंता नेणे देवळींच ॥ ३ ॥ तुका म्हणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ॥ ४ ॥

॥ ६५३९ ॥ घरीं रांडा पोरें मरती उपवासी । सांगे लोकांपासी थोरपण ॥ १ ॥ नेऊनियां घरा दाखवावें काय । काळतोंडा जाय चुकावूनि ॥ २ ॥ तुका ह्मणे आह्मी जाणों त्या प्रमाण । ठकावे हे जन तैसे नहों॥३॥

॥ ६५४० ॥ निघालें दिवाळें । झालें देवाचें वाटोळें ॥ १ ॥ आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनिच्या मनीं ॥ २ ॥ गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लावियेली वाती ॥ ३ ॥ तुका ह्मणे करा । ऐसा राहे माजी घरा ॥ ४ ॥

॥ ६५४१ ॥ तुकोबाची कांता सांगे लोकांपाशीं । वेडा पंढरीशी जातो बाई ॥ १ ॥ माझे मायबापें बरें नाहीं केलें । पदरीं बांधिलें भिकाऱ्याच्या ॥ २ ॥ चौघी माझ्या बहिणी नांदती सुखाच्या । माझी कर्मदशा ऐशी झाली ॥ ३ ॥ फुटकाचि वेणू तुटक्याचि तारा । घाली येरझारा पंढरीसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे तिनें ऐसें न करावें । परी शरण जावें विठोबाला ॥ ५ ॥

॥ ६५४२ ॥ तुकोबाची बाईल कैसी । मारी बुदबुदां पोरांसी ॥ १ ॥ मेला जन्माचा भिकारी । नित्य सोडीना पंढरी ॥२॥ गुज ऐके शेजे नारी । पिसा हिंडे दारोदारीं ॥ ३ ॥ तुका म्हणे धीर धरी । अझुनी काय झालें तरी ॥ ४ ॥

॥ ६५४३ ॥ आइलेनें भलें । ह्मणे दाविलें चांगलें ॥ १ ॥ एकाविण एका । वेचें मोल होतें फुका ॥ २ ॥ काळिमेनें राती । दिवस कळा आली होती ॥ ३ ॥ उंच नीच गारा । हिरा परीस मोहरा ॥ ४ ॥ विषें दाविलें अमृत । कडू गोड घात हीत ॥५॥ तुका ह्मणे भले । तैसे नष्टानें दाविलें ॥६॥

## फाल्गुन शुद्ध एकादशीच्या दिवशीं देवासमोर उभें राहून कीर्तन केलें.

॥ ६५४४ ॥ जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ॥ १ ॥ हेंचि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ॥ २ ॥ भाक्तितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ॥ ३ ॥ तुका ह्मणे डोयी । ठेवीं वेळोवेळां पायीं ॥४ ॥

॥ ६५४५ ॥ न राहे क्षण एक वैकुंठीं । क्षीरसागरीं त्रिकुटीं ॥ जाय जेथें दाटी । वैष्णवांची धांवोनी ॥ १ ॥ भाविक गे माय । भोळे गुणाचे ॥ आवडे तयाचें । नाम घेतां तयासीं ॥ २ ॥ जो नातुडे कवणीये परी । तपें दानें व्रतें थोडीं ॥ ह्मणतां नाचे हरी । रामकृष्ण गोविंद ॥ ३ ॥ चौदा भुवनें जयाच्या पोटीं । तो राहे भक्तांचिये कंठीं ॥ करोनीयां साठीं । चित्त क्षेम दोहींची ॥ ४ ॥ जया रूप ना आकार । धरी नाना अवतार ॥ घेतलीं हजार । नांवें ठेवुनी आपणा ॥ ५ ॥ ऐसा भक्तांचा हा ऋणी । पाहतां आगमीं पुराणीं ॥ नाहीं तुका ह्मणे ध्यानीं । तो कीर्तनीं नाचतसे ॥ ६ ॥

॥ ६५४६ ॥ बरवा झाला वेवसाव । पावलों चिंतिलाची ठाव ॥ दृढ पायीं राहिला भाव । पावला जीव विश्रांती ॥ १ ॥ बरवा फळला शकुन । अवघा निवारला शिण ॥ तुमचें झालिया दरुषण । जन्ममरण नाहीं आतां ॥ २ ॥ बरवें झालें आलों ठाया । होतें संचित ठायींच्या पायां ॥ देह भाव पालटली काया । पडली छाया ब्रम्हींची ॥ ३ ॥ जोडलें न सरे हें धन । अविनाशी आनंदघन ॥ अमूर्त मूर्ति तूं मधुसुदन । समचरण देखियेले ॥ ४ ॥ जुनाट युगादीचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें ॥ लोपलें होतें पारिखेपणें । ठाव चळणें चुकाविला ॥ ५ ॥ आतां या जीवाचिये साठीं । न सोडी पडलिया मिठी ॥ तुका ह्मणे शिणलों जगजेठी । न लावी दिठी दुसऱ्याची ॥ ६ ॥

॥ ६५४७ ॥ देवा तूं आमचा कृपाळ । भक्तप्रतिपाळ दीनवत्सल ॥ माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥ १॥ तुजलागीं चिंता । राखणें लागे वांकडें जातां ॥ नये विसंबतां । धीर तुज ॥ २ ॥ आम्हां भय चिंता नाहीं धाक । जन्म मरण कांहीं एक ॥ झाला इहलोकीं परलोक । आलें सकळीक वैकुंठ ॥ ३ ॥ नकळे दिवस किंवा रात्री । अखंड लागलीसे ज्योति ॥ आनंदलहरीची गती । वर्णूं किती तया सुखा ॥ ४॥ तुझिया नामाचीं भूषणें । तुवां मज लेवविलें लेणें ॥ तुका म्हणे तुझिया पुण्यें । काय तें उणें एक आम्हा ॥ ५ ॥

॥ ६५४८ ॥ आतां येणें बळें पंढरीनाथ । जवळी राहिला तिष्ठत ॥ पहातां नकळे जयाचा अंत । तोचि हृदयांत घालूं आतां ॥ १ ॥ विसरोन आपला देहपणभाव । नामें भुलला पंढरीराव ॥ न विचारी याति कुळ कांहीं ठाव । लागावया पाव संतांचे ॥ २॥ बरें वर्म आलें आमुच्या हातां । हिंडावें धुंडावें न लागतां ॥ होय अविनाश सत्ताकार दाता । चतुर्भुज संतां परी धांवें ॥ ३ ॥ आवडी होय सान थोर । रूप सुंदर मनोहर ॥ भक्तिभाव लोभापर । पाहे आदर याचकपणें ॥ ४ ॥ तें वर्म आलें आमुचिया हातां । म्हणोनि शरण रिघालों संता ॥ तुका म्हणे पंढरीनाथा । न सोडी आतां जीवेंसी ॥ ५॥

॥ ६५४९ ॥ कथा त्रिवेणीसंगम । भक्त आणि देवनाम ॥ तेथीचें उत्तम । चरणरज वंदितां ॥ १ ॥ जळती दोषांचें डोंगर । शुद्ध होतीं नारीनर ॥ गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥ २ ॥ तीर्थें तयां ठायां येती पुनीत व्हावया ॥ पर्वकाळ पायां । तळीं वसे वैष्णवा ॥ ३ ॥ अनुपम्य हा महिमा । नाहीं द्यावया उपमा ॥ तुका म्हणे ब्रह्मा । नेणें वर्णूं या सुखा ॥ ४ ॥

---

ये समयीं तुकारामाच्या दर्शनेंकरून पुनीत होण्यास तीर्थें, व्रतें, पर्वकाळ इत्यादि मूर्तिमंत आलीं.

---

॥ ६५५० ॥ पापताप दैन्य जाय उठाउठी । झालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥ ऐसें बळ नाहीं आणिकांच्या आंगीं । तपें तीर्थें जगीं दानें

अतें ॥ २ ॥ चरणींचें रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं याचे माथां ॥ ३ ॥ भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे मना झालें समाधान । देखिले चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

---

नंतर इंद्रादि देवगण वगैरे दर्शनास आले.

---

॥ ६५५१ ॥ संतांचें सुख झालें या देवा । ह्मणुनी सेवा करी त्यांची ॥ १ ॥ तेथें माझा काय कोण तो विचार । वर्णावया पार महिमा त्यांचा ॥ २ ॥ निर्गुण आकार झाला गुणवंत । घाली दंडवत पुजोनियां ॥ ३ ॥ तिर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आपणांसी ॥ ४ ॥ अष्टमा सिद्धिचा कोण आला पाड । वागों नेदी आड कोण्ही तया ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेव्हां बाळिया शिरोमणी । राहिलों चरणी निकट वासें ॥ ६ ॥

॥ ६५५२ ॥ नामाचिया बळें कैवल्य साधन । उगेची निधान हाता चढे ॥ १ ॥ जाणोनी हें वर्म भक्त भागवत । राहिलों निवांत प्रेमबोधें ॥ २ ॥ कोण जपतप वाहे हें कावाड । म्हणती आवघड यारे नाचों ॥ ३ ॥ उघडा समाधी हरिकथा सोहळा । नरनारी बाळां लहान थोरां ॥ ४ ॥ छंदें वाहती टाळी गाती नामावळी । जयजयकारें होळी दहन दोष ॥ ५ ॥ येणें ब्रह्मानंदें दुमदुमिलें जग । सुलभ हा मार्ग सांपडला ॥ ६ ॥ तुका ह्मणे हरिभक्तीचा उल्हास । आणिलासे त्रास यमदुतां ॥ ७ ॥

॥ ६५५३ ॥ शब्दांचीं रत्नें करूनी अलंकार । तेणें विश्वंभर पूजियेला ॥ १ ॥ भावाचे उपचारें करविलें भोजन । तेणें नारायण जेवविला ॥ २ ॥ संसारहातीं दिलें आचमन । मुखशुद्धी मन समर्पिलें ॥ ३ ॥ एक भाव दीप केला निरंजन । करोनी आसन देहाचिया ॥ ४ ॥ रंगलीं इंद्रियें करोनी तांबुल । माथां तुळसीदळ समर्पिलें ॥ ५ ॥ न बोलोनी तुका करी चरणसेवा । निजविलें देवा माजघरीं ॥ ६ ॥

याप्रमाणें एकादशीपर्यंत जागर केल्यानंतर द्वादशीस पारणें सोडण्यास तुकाराम बावांस संतांसह देवानें आपल्या उताऱ्यास अमंत्रण दिलें.

॥ ६५५४ ॥ देवाच्या प्रसादें करावें भोजन । व्हाल कोण कोण भाग्याचे ते ॥ १ ॥ ब्रह्मादिकांसी हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥ २ ॥ अवघिया पुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥ ३ ॥ इच्छादानी येथें बोलला समर्थ । अवघेचि आर्त पुरवितो ॥ ४ ॥ सरे ऐसें येथें नाहीं कदा काळीं । पुढती वाटे कवळी घ्यावे ऐसें ॥५॥ तुका ह्मणे पाक लक्ष्मीच्या हातें । कामारी सांगातें निरुपम ॥ ६ ॥

॥ ६५५५ ॥ ब्रह्मादिक जया लाभासी ठेंगणें । बळिये आम्ही भले शरणांगत ॥ १ ॥ कामनेच्या सागें भजनाचा लाभ । झाला पद्मनाभ सेवाऋणी ॥ २ ॥ बसलिये ठायीं लाविलें भरतें । त्रीपुटी वरूतें भेदी ऐसें ॥३॥ कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाहीं वरुषावें ॥ ४ ॥ हरि नाहीं आह्मां विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसांवला ॥ ५ ॥ तुका म्हणे बहु लाटे हें भोजन । नाहीं रिता कोण राहत राहों ॥ ६ ॥

देवानें विचारिल्यावरून तुकारामबावांनीं देवास संगातें जेवण्यास विनंति केली.

॥ ६५५६ ॥ आवडी कां ठेऊं । बैसोनियां संगें जेवूं ॥ १ ॥ मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ॥ २ ॥ देखिले प्रकार । यात्रे पाहेन साचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी । केली चाहाडी सकळीं ॥ ४ ॥

जैसें माता अवडीनें मुलास स्तनपान करिते तसें देव तुकोबांस प्रेमानें वोरसतात.

॥ ६५५७ ॥ अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची ॥ १ ॥ देव सोयरा देव सोयरा । देव सोयरा दिनांचा ॥ २ ॥ आपुलिया वैभवें । शृंगारावें निर्मळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेवी सवें । प्रेम घ्यावें प्रीतीचें ॥ ४ ॥

॥ ६५५८ ॥ मायबापाचिये भेटी । अवघ्या तुटी संकोचा ॥ १ ॥ भोगिलें तें आहे सुख । खातां मुख मोकळें ॥ २ ॥ उत्तम तें बाळासाठीं । लावी ओठीं माउली ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाली धणी । आनंद मनीं न समाये ॥ ४ ॥

॥ ६५५९ ॥ देवें जीव धाला । संसार तो कडू झाला ॥ १ ॥ तेच येताती ढेंकर । आनंदाचे हरिहर ॥ २ ॥ वेधी आणिकांस । ऐसा जया अंगीं कस ॥ ३ ॥ तुका ह्मणे भुक । येणें नलगे आणीक ॥ ४ ॥

॥ ६५६० ॥ धालों सुखें ढेंकर देऊं । उमटे जेऊं तोंवरी ॥ १ ॥ क्रीडा करूं निरंजनीं । न पुरे धणी हरीसवें ॥ २ ॥ अवघे खेळों अवघ्यामधीं । ठायीं न पडो ऐसी बुद्धि ॥ ३ ॥ तुका ह्मणे वांचवितां । आज्ञा सत्ता समर्थ ॥ ४ ॥

॥ ६५६१ ॥ आमुचें जीवन हें कथा अमृत । आणिकही संतसमागम ॥ १ ॥ सारूं एके ठायीं भोजन परवडी । स्वाद रसें गोडी पदोपदीं ॥ २ ॥ धालिया ढेंकर येती आनंदाचे । वोसंडलें वाचे प्रेमसुख ॥ ३ ॥ पिकलें स्वरूप आलिया घुमरी । रासी ते अंबरीं न समाये ॥ ४ ॥ मोजितां तयाचा अंत नाहीं पार । खुंटला व्यापार तुकयाचा ॥ ५ ॥

---

## प्रयाणकाळीं तुकारामबावांनीं स्त्रीस सांगातें यावें ह्मणून बोलणें केलें ते समयीं संसार सांडून येत नाहीं असें म्हटल्यावरून उपदेश केला तो.

॥ ६५६२ ॥ होसी पुत्रवंती नारायण सुखें । पहासी पुत्रमुख आशिर्वचन ॥ १ ॥ जातां हा शेवट त्वां गोड केला । कळस झाला येथूनियां ॥२॥ तुका ह्मणे आतां झालें समाधान । समाखिलें मन सेवटींचें ॥ ३॥

॥ ६५६३ ॥ स्त्रियेसी हो तुका जातो सांगोनियां । बैसा ह्मणोनियां जातों आह्मी ॥ १ ॥ सडा संमार्जन तुळसीवृंदावन । देवाचें पूजन करित जावें ॥ २ ॥ तुझिये गर्भी आहे नारायण । तो तुजलागोन उद्धरील ॥३॥ ऐसे बोलोनीयां तुका पुढें आले । सद्गदित झालें हृदय तिचें ॥ ४ ॥

तुकाराम बावा वैकुंठास चालले असें समजून जिजाबाई त्यास सांगातें प्रवासाची सामोग्री व कांहीं पैसा घेऊन जा असें ह्मणाली तेव्हां बोलले.

॥ ६५६४ ॥ आम्हा हेंचि भांडवल । ह्मणों विठ्ठल विठ्ठल ॥ १ ॥ सुखें तरों भवनदी । संगें वैष्णवांची मांदी ॥ २ ॥ वाखराचें वाण सांडू । हें जेऊं जेवण ॥ ३ ॥ नलगे वारंवार । तुका ह्मणे वेरझार ॥ ४ ॥

॥ ६५६५ ॥ आतां हेंची जेऊं । सवें घेऊं सिदोरी ॥ १ ॥ हरिनामाची खिचडी काला । प्रेमसाधनें मोहिला ॥ २ ॥ चवीं चवीं घेऊं ग्रास । ब्रह्मरस आवडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोड लागे । तों तों मागे रसना ॥ ४ ॥

तेव्हा तुकाराम बावा ह्मणाले कीं आतां वैकुंठास चलावें मग तुकाराम बावा आपले समागमें संत होते त्यांस व बंधु व स्त्रीपुत्र यांस बोलिले कीं मी वैकुंठास जातों तुह्मी सकळ समागमें चला तुह्मांसही नेतों तेव्हां अभंग बोलिले.

॥ ६५६६ ॥ अवघियांच्या आलों मुळें । एक वेळे न्यावया ॥ १ ॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥२॥ जोंवरी ते घटका दुरी । आहे उरी तो काळ ॥ ३ ॥ मंगळाचे वेळे उभे । असों शोभे सावध ॥ ४ ॥ अवघियाचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥ ५ ॥ तुका ह्मणे पाहें वाट । बहु आट करूनियां ॥ ६ ॥

॥ ६५६७ ॥ स्वल्प वाट चला जाऊं । वाचे गाऊं विठ्ठल ॥ १ ॥ तुह्मी आह्मी खेळों मेळीं । गदारोळी आनंद ॥ २ ॥ ध्वजा कुंचे गरुडटके । शृंगार निके करूनियां ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंचि निट । जवळी वाट वैकुंठ ॥ ४ ॥

## संगातें कोणी येत नाहीं असें पाहून तुकाराम तेथून निघाले.

॥ ६५६८ ॥ रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐसा मज धीरें राख आतां ॥ १ ॥ संसाराहातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करी नारायणा ॥ २ ॥ वागवितों तुझ्या नामाचें हत्यार । हाचि बडिवार मिरवितों ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पुरें तुम्ही जाणा ॥ ४ ॥

॥ ६५६९ ॥ केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ॥ १ ॥ होय तैसें होय आतां । देहबळी काय चिंता ॥ २ ॥ पीडिले पाळवीं । त्यांचा धाक वाहे जीवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जिणें । देवा काय हीनपणें ॥ ४ ॥

## मग अभंग गात गात राउळीं परत आले तो अभंग.

॥ ६५७० ॥ झालें समाधान । तुमचे धरिले चरण ॥ १ ॥ आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ॥ २ ॥ सुखाडिकपणें । येथें सांपडलें केणें ॥ ३ ॥ तुका म्हणे भाग । गेला निवारला लाग ॥ ४ ॥

## त्यानंतर तुकाराम बावांनीं भजन करून देवांस आरती करून लळीत केलें.

### आरति.

॥ ६५७१ ॥ जगदीश जगदीश तुज म्हणती । परि या जना माजी असशील युक्ती ॥ पुण्य पाप विरहित सकळां अधिपती । दृष्टा परी नळणी अलिप्त गती ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पंढरीनाथा श्री पंढरीनाथा । नुरे पाप विठ्ठल ह्मणतां सर्वथा ॥ २ ॥ आगमनिगम तुज नेणती कोणी । परी तूं भावभक्ति जवळीच दोन्ही ॥ नेणतां विधियुक्त राते पूजनीं । न माय ब्रम्हांडीं संपुष्ट शयनीं ॥ ३ ॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरी मुख एक चावितो धुंडें ॥ भक्तां शरणांगता चाले तो पुढें । दावी वाट जाऊं नेदी वांकुडें ॥ ४ ॥ एकाएकीं बहू विस्तरला सुखें । खेळे लीळा त्याची तोचि कौतुकें ॥ तेथें नरनारी कवण बाळकें । काय पाप पुण्य कवण सुख दुःखें ॥ ५ ॥ सकळां वर्मां तूंचि जाणसी एक । बंध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख ॥ आणूं म्हणती तुज ठकलीं बहुतेक । तुका म्हणे शरण आलों मज राखें ॥ ६ ॥